डिस्ट्रिक्ट ३१३१
क्लब नं.८६३९९

PUNE HERITAGE

# रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज

RI President: Holger Knaack

# संस्कृती

संपादक : रो. सुचित्रा शिंत्रे
सहकारी : रो. सोनाली वैशंपायन, रो. श्रीकांत कानेटकर, रो. मोहन चौबळ

प्रांतपाल २०२०-२१
रो. रश्मी कुलकर्णी
अध्यक्ष: रो. विनय नेवसे
सचिव: रो. विवेक जोशी
अंक ३ रा, सप्टेंबर २०२०

## अध्यक्षीय...

**नमस्कार मित्रमैत्रिणींनो,**



ह्या वर्षातील दोन महिने पार पडले. दुसऱ्या बुलेटिन अंकात अध्यक्षीय लिहिताना एक आनंदाची बातमी रोटरी इंटरनॅशनल प्रे. होलगर कनक यांनी जाहिर केली ती म्हणजे आफ्रिका खंडातून पोलिओ ह्या जीवघेण्या, तसेच लहान मुलांमध्ये अपंगत्व निर्माण करणाऱ्या आजाराचे उच्चाटन झाले आहे. गेल्या अंकात मी सांगितले होते, रोटरीने १९७९ सालापासून जगातुन पोलिओ निर्मूलनाचा विडा उचलला आहे व ते कार्य अजूनही अव्याहतपणे चालू आहे. मित्रांनो, अजूनही आशिया खंडातील दोन देशातून पोलिओचे रुग्ण सापडत आहेत त्यामुळे हे काम चालूच राहणार आहे, ह्या कामी लागणारा पैसा आपल्याला उभारायचा आहेच.

ऑगस्ट महिना नवीन सदस्यांना आपल्या कुटुंबाशी जोडण्याचा महिना होता व गेल्या महिन्यात आपण ५ सदस्यांना आपल्या कुटुंबात सामील करून घेतले, आता आपले कुटुंब ५७ सदस्यांचे झाले आहे व लवकरच आपण साठी गाठू यात शंका नाही. कम्युनिटी सर्व्हिस अंतर्गत आपण भारत इंग्लिश स्कुल , शिवाजीनगर ह्या शाळेत सॅनीटाईझर स्टॅंड, टेम्परेचर गन, मास्क असे साहित्य दिले. डिस्ट्रिक्टच्या लिटरसी ह्या अव्हेन्यू मध्ये आपल्या क्लब तर्फे जवळजवळ १०० शिक्षकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत सुंदर असा सम्पूर्णतः सुनियोजित पद्धतीने हा कार्यक्रम सम्पूर्ण आठवडा चालू होता.

मित्रांनो, बघता बघता आपल्या १० मिटींग दोन महिन्यात पार पडल्या. झूम मिटिंग्ज वर सुरवातीला आपल्याला जमेल का , उपस्तिथी किती राहिल, काही गडबड तर होणार नाही ना, असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. त्याची उत्तरे मिटिंग्जला असलेल्या उपस्थितीनेच दिली. ह्याचं श्रेय आपल्या टेक्निकल टीम, प्रोग्राम कमिटी तसेच कल्चरल कमिटी व सर्व हेरिटेज परिवारातील सदस्यांना जाते. महाभारतातील विविध पात्रांची भूमिका व त्यावरील निरूपण हा सुंदर कार्यक्रम आपले सदस्य रो. विनय वाघ करत आहेत, व त्यामुळे बिझनेस मिटींगची उपस्थिती देखील खूपच चांगली आहे. आपल्या युथ टीमने इन्ट्रॅक्ट क्लबचे छोटे छोटे प्रोजेक्ट देखील खूपच सुंदर पद्धतीने चालू आहेत. लॉक डाऊन मुळे शाळा बंद असताना मुलांना व्यस्त ठेवणे हे थोडे अवघडच परंतु आपल्या युथ टीमने खूप अभिनव असे टास्क ह्या मुलांना दिले व सर्व बालचमू त्यात हिरीरीने सहभाग नोंदवत आहेत.

आता अनलॉक ४ ची प्रक्रिया देशभरात सुरू झाली आहे, परंतु अजूनही करोनाची साथ थांबली नाही. त्यामुळे आपल्याला घरातून बाहेर पडताना, तसेच खेळताना मुलांनी काय काळजी घ्यावी ह्यासाठी आपल्या पब्लिक इमेजच्या टीमने एक छान अशी फिल्म तयार केली आहे आणि विशेष म्हणजे ह्या फिल्ममध्ये आपल्या हेरिटेज क्लब मधील अनेट्स चा सहभाग आहे. ही फिल्म जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपण पोहचवावी अशी मी तुम्हा सर्वांना हेरिटेज क्लबच्या वतीने विनंती करतो. त्याची यु ट्यूब, व फेसबुक लिंक खाली देत आहोत, जास्तीत जास्त शेअर करा, लाईक करा व आपल्या आप्तेष्टांच्या पर्यंत पोहचवा.
पुढील महिना सप्टेंबर हा रोटरीचा लिटरसी मंथ आहे, व ह्यात भरपूर काम आपण करणार आहोत तेंव्हा पुढच्या महिन्यात भेटुयात, धन्यवाद.

**-रो. विनय नेवसे**

---

रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज

**WERE YOUR MASK**

**MY MASK PROTECTS YOU**

**YOUR MASK PROTECTS ME**

**Only Together Can We Save Lives**

## संपादकीय...



हॅलो डॉक्टर, 'मी कोरोना पॉझिटिव्ह आहे. मी आणि माझा मुलगा दोघेही पॉझिटिव्ह.

**डॉक्टर :** अरे जयवंत, हे बघ तु पंचावन्न वर्षांचा आहेस. तुला बीपी पण आहे, बेटर तू ॲडमिट हो. आत्ता तुला काय होतंय?

**जयवंत :** सर्दी, खोकला, ताप काहीही नाही.

**डॉक्टर :** ओके, सांगतो. तुला कुठे ॲडमिट हो ते. (हे जयवंत आणि त्याचा एक डॉक्टर मित्र या दोघांचे संभाषण).

संभाषण ऐकून पायाखालची जमीन जोरदार सरकली.

**जयवंत :** हॅलो, राजू अरे टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे. माझी आणि केदारची. आणि डॉक्टर ॲडमिट हो म्हणतोय.

**राजू :** थांब मी मधुमिताला सांगतो.

पुढच्या १० मिनिटात मधुमिता डॉक्टरांशी बोलली. कोविड योद्धा म्हणून सत्कार केलेल्या डॉक्टरांशी बोलली. त्या डॉक्टरांकडून आलेला मेसेज आणि फोन नंबर मधूमिताने मला फॉरवर्ड केला. आणि आम्हा दोघांना राजूचा फोन आला.

'मेसेज बघ, फोन कर ते डॉक्टर तुझी सोय करतील'.

त्याच बरोबर डॉ. अमित मुंगळेला फोन केला. त्यांनी धीर देऊन सांगितले. राजू काकांची मदत हाताशी ठेवा. पण आता ॲडमिट होऊ नका. मी औषधे पाठवतो, लगेच सुरुवात करा. त्यांनी रात्रीच औषधे आणून दिली. आता जयवंत आणि केदार दोघेही छान आहेत.

मला असे मित्र-मैत्रिण रोटरीने दिले याचा मला अभिमान वाटतो. या प्रकारचा अनुभव आम्हा सर्वांना सगळ्या मित्र-मैत्रिणीबाबतीत आला आहे. हे रोटरी घडवते. चांगल्या गोष्टी, चांगली माणसे, समृद्ध अनुभव रोटरी देते.

राजू-मधुमिता, डॉ. अमित आणि इतर सर्व मित्र मैत्रिणींनी फोन करून जयवंतशी बोलून टेन्शन कमी केलं. जयवंतला ॲडमिट व्हावे लागले नाही ही गोष्ट वेगळी पण दहा मिनिटांत मदत करणारे माझे मित्र रोटरींनी मला दिले.थँक्यू रोटरी.

**-रो. सुचित्रा शिंत्रे**

## वैद्य. श्री.य.गो. जोशी मुलाखत



कोणत्याही विषयावर अधिकारवाणीने बोलायचे असेल तर त्या विषयातील सखोल ज्ञान आणि दांडगा अनुभव असणे आवश्यक असते. असेच एक अधिकारी व्यक्तिमत्व, वैद्य श्री. य.गो जोशी हे आपल्याला रोजच्या जीवनातील आरोग्यासंबंधी सोपे उपाय सांगण्यासाठी आले होते. आजच्या युगातील एक तेजस्वी ऋषीच आहेत ते! त्यांच्या मुलाखतीतून आरोग्याच्या बऱ्याच गोष्टी आपल्याला समजून घेता आल्या. छोट्या छोट्या आजारांसाठी आपण डॉक्टरांकडे पळतो. महागडी औषधे, उपचार करवून घेतो आणि त्यातून आपल्या शरीराचेच नुकसान होते हे आपल्याला उशीरा कळते.

आजकाल सोशल मिडियामुळे प्रत्येकजण आपल्या प्रॉडक्टची जाहिरात करत असतो आणि आपण त्याला भुलतो. त्याचा खरे खोटेपणा पडताळून पाहण्याची तसदी आपण घेत नाही. स्वत:चे अनुभव काय आहेत यांचा विचार करत नाही. सफोला हे हृदयरोगासाठी उत्तम तेल आहे, असे अनेक गैरसमज दादा जोशींच्या मुलाखतीमुळे दूर झाले. आपल्या समोर, हाताशी असलेल्या पदार्थांचे गुण जाणून आपण त्यांचा वापर योग्य रीतीने केला तर छोटे विकार सहजपणे दूर करू शकू असा विश्वासही निर्माण झाला. पोटांचे विकार,डोकेदुखी, ब्लडप्रेशर यांविषयीच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. श्री. य. गो. जोशी हे आपली सभासद स्वाती सेन हिचे वडील असून आपल्यालाही पितृ व गुरूस्थानी आहेत. त्यांचे व्याख्यान किंवा मुलाखत अत्यंत सोप्या भाषेत आणि समजावून सांगितल्यासारखे वाटते. पुन्हा पुन्हा त्यांच्या मार्गदर्शनचा लाभ आपल्याला मिळावा हीच इच्छा!

**-रो.सुप्रिया जोगदेव**



# क्लब विषयी...

**मित्रानो..**

कम्युनिटी इंटेरेक्ट आणि रोटरॅक्ट म्हणजे वयोगट ८-१३ आणि १४-२० हया संकल्पनेनुसार आपण ऑनलाईन वैविध्यपूर्ण कलाकृती गणेशाची स्पर्धा आणि श्लोक पठण स्पर्धा हया ॲक्टिव्हिटीज घेतल्या. त्यात आपल्याला दोन्ही मिळून ३८ आणि ७२ म्हणजे ११० एंट्रीज मिळाल्या आणि ५५००/- फंड जमा झाला. त्यासाठी युथ टीमचे भरपूर सहकार्य लाभले. विशेषतः विनय वाघ, शुभरो, केदार,उत्तम, शशिकांत, स्वाती कुरुंदकर, प्रतिभा, आणि सचिन. तसेच प्रेसिडेंट विनयने आम्हाला हयाकरिता प्रोत्साहित केले त्याबद्दल त्यांचे आणि सेक्रेटरी विवेकजी यांचे विशेष धन्यवाद...

**–रो. हर्षदा बावणकर**

**८ ते १३ वयोगट**

१) वेदजोशी- प्रथम क्रमांक २) अदरीजा बसक- द्वितीय क्रमांक

३) अदिती काळे- तृतीय क्रमांक

**१४ ते २० वयोगट**

१) प्रसाद जोगदेव- प्रथम क्रमांक. २) आयुष शर्मा- द्वितीय क्रमांक.

३) चिरायु गुगळे-तृतीय क्रमांक.



















**मित्रांनो,**

दरवर्षीच आपण आपल्या क्लबमध्ये गणपती डेकोरेशन स्पर्धा आयोजित करतो. गणपती येण्यापूर्वीच चार दिवस आधी आपल्या क्लब तर्फे डॉ. देगलूकर यांचे गणपती मूर्ती विषयी अतिशय उद्बोधक असे भाषण झाले होते. त्यातूनच मूर्ती स्पर्धेची कल्पना साकारली आणि आपण दोन स्पर्धा घेतल्या. १) गणपती सजावट २) गणपती मूर्ती.

या वेळेला आपल्याच काही मेंबर्सनी उत्साहानी स्वत: घरी गणपती मूर्ती बनविली होती. त्यांचेही कौतुक करावे हाही हेतू यामागे होता.

क्लब मिटींगला निकाल जाहीर झाला, पण सगळे मेंबर्स मिटींगला हजर नसतात, म्हणून इथे निकाल देत आहे.

**१) गणपती सजावट**

* तेजश्री हिरवे - प्रथम क्रमांक
* विवेक जोशी - द्वितीय क्रमांक
* सोनाली वैंशपायन - तृतीय क्रमांक

**२) गणपती मूर्ती**

* उत्तम बापट - प्रथम क्रमांक
* शशांक बारटक्के - द्वितीय क्रमांक
* संजय महाजन - तृतीय क्रमांक

परत एकदा सर्व बक्षिस विजेत्यांचे अभिनंदन

**– रो. मधुमिता बर्वे**

# ‘कावळा’

‘याच दिवसात उदघाटन कशाला?’ आजोबांनी तावातावाने बोलायला सुरवात केली. आजी काहीच बोलली नाही. हे अपेक्षितच होते म्हणून मानव शांत राहिला. ‘तुझ्या हॉटेलच्या उदघाटनाला आमच्यापैकी कोणीही येणार नाही’ आजोबा. ‘जायचं का नाही,व्हॉट हॅपण्ड’ हेडफोन काढत विनीने विचारले.



‘तू गप्प बस,तुला नाही कळणार’ बाबांनी दटावले तेव्हा विनी चिडली.‘मानव,थोडे दिवस थांब,चांगला मुहूर्त बघून उदघाटन कर,जास्त नाही फक्त पंधरा दिवस ’ बाबा. ‘अशुभ दिवसात चांगल्या कामाची सुरवात करत नाहीत.’ आजोबा म्हणाले. ‘नातू नवीन हॉटेल सुरु करतो आहे ,तुमचे आशीर्वाद पाहिजेत, सगळ्यांना सोयीचा म्हणूनच उदघाटनचा दिवस ठरवला आणि चांगल्या कामासाठी मुहूर्ताची गरज नाही हे तुम्हीच म्हणायचा ना’ विज्ञानाची प्राध्यापक असलेल्या विभाने लेकाची बाजू मांडली. ‘तुझी फूस असल्यावर तो असे वागणारच’ आजोबा कडाडले. घरातले वातावरण एकदम टेन्स झाले.

मानव एका फॉरेनर मित्रासोबत पार्टनरशिप मध्ये हॉटेल सुरु करणार होता आणि नेमकी उदघाटनची तारीख ‘पितृपक्षा’मध्ये येत होती. त्यावरून भारतापासून शेकडो मैल दूर परदेशात राहत असलेल्या भारतीय कुटुंबामध्ये वाद सुरु झाला. ‘आता नवीन जमाना आहे आणि इथल्या लोकांना पितृपक्ष वैगरे माहितसुद्धा नाही’ विनीने पुन्हा आपले मत मांडले

‘आपला देश सोडला म्हणून सगळ्या रूढी,परंपरा या सगळ्यांना विसरायचे का?? वर्षानुवर्षे,पिढ्यानपिढ्या चालत आलेले संस्कार देश सोडला की टाकाऊ ठरत नाही’ आजोबा चिडले. ‘शंभर टक्के बरोबर,आपल्या रूढी,परंपरा, चालीरीती यांचे महत्व आहेच,मी ते कधीच नाकारणार नाही, सगळेच टाकाऊ,आउट डेटेड आहेत असंही नाही.त्यांच्याविषयी आदर होता आणि कायमच राहील.तुमच्या इतकेच त्यांनाही मी मानतो. फक्त काही बाबतीत  माझे विचार वेगळे आहेत,’ मानव म्हणाला.

‘आता तू नवीन काही सांगून वाद वाढवू नकोस’ बाबांनी मानवला दटावले. ‘त्याला थांबवू नकोस,बोलू दे.’ आजोबांनी सांगितल्यावर बाबांचा नाईलाज झाला. ‘काळानुसार आपणही बदलायला हवे, प्रॅक्टिकल व्हायला हवे, बदल स्वीकारले पाहिजेत’ मानव म्हणाला. आजी सूचक हसली आणि मी तुझ्याबरोबरच आहे हे दाखविण्यासाठी तिने मानवला हात वर करून अंगठा दाखवला, त्यामुळे आजोबा भडकले. ‘वाटलंच मला तू नातवाचीच बाजू घेणार,अगं अशुभ काळामध्ये तो शुभ काम करतो आहे. त्याला समजवायचे सोडून तू सुद्धा....’ ‘शुभ-अशुभ याबाबतीत पसंद अपनी अपनी’ आजीने आपली भूमिका स्पष्ट केली.

‘म्हणजे ‘शुभ-अशुभ’ या दोन्ही गोष्टी व्यक्तीनुसार वेगवेगळ्या आहेत, सरसकट हे शुभ ते अशुभ असं ठरवू शकत नाही. आपल्याकडे पितृपक्ष आहे, हे दिवस अशुभ आहेत असं मानले जाते. पण इथल्या लोकांना त्याविषयी काहीच माहिती नाही,त्यांच्या दृष्टीने नॉर्मल दिवस आहेत.’ आजोबांनी थांबण्याची खुण केली म्हणून मानव गप्प बसला.

‘मला या विषयावर वाद घालायचा नाही,माहिती असून सुद्धा विषाची परीक्षा घेऊ नये एवढंच वाटतं’ आजोबा निघून जाऊ लागले तेव्हा विभाने त्यांना थांबवले. ‘रागावू नका,त्याचे म्हणणे तरी ऐकून घ्या,तो काहीतरी वेगळं सांगण्याचा प्रयत्न करतो आहे’ विभाने आग्रह केला म्हणून आजोबा थांबले.

‘पितृपक्ष वाईट,अशुभ हे मनावर बिंबले गेले आहे आणि असेच का?? हा विचार मनात येत नाही आणि या दिवसांना अशुभ का मानतात हे शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पितृपक्षात आपल्या घरातील ज्या व्यक्ती आता हयात नाहीत अशा सर्व माहिती असलेल्या आणि नसलेल्या सर्वांची आठवण म्हणून विधी केला जातो.खास पदार्थ बनविले जातात.ते कावळ्याने खाल्ले तर पूर्वजांपर्यंत पोहचतात असे समजले जाते.’

‘मग त्यात वाईट काय???आपल्या पूर्वजांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे चांगलंच आहे आणि जे माहिती आहे तेच तू सांगतो आहेस,’ आजोबा. ‘या काळात श्राद्ध कार्य, पूजा केली म्हणजे आपल्या पूर्वजांशी कनेक्ट होता येते, बरोबर’ मानवने विचारले. ‘बरोबर’ आजोबा. ‘मग आजोबा मला हेच सांगायचे आहे की ज्यांच्यामुळे माझे अस्तित्व आहे,त्यांच्या आशीर्वादासाठी पितृपक्ष हाच सगळ्यात चांगला काळ आहे, कारण याकाळात त्याच्याशी सहज कनेक्ट होता येते. हे वाईट किवा अशुभ असूच शकत नाही ’ ‘डोकं ठिकाणावर आहे का??काहीही काय बोलतोस’ आजोबांनी म्हटले पण ते सुद्धा विचारात पडले.

‘तो बरोबर बोलतो आहे,जर पितृपक्षात केलेली कार्ये,पदार्थ पूर्वजांपर्यंत पोहोचतात तर मग  या दिवसात चांगल्या कामाची सुरवात केली तर हरकत काय !!!’आजीने परत मानवची बाजू घेतली. ‘प्रत्येकाच्या विचारातला हा फरक आहे त्यावर तोडगा नाही.शब्दाला शब्द वाढून फक्त एकमेकांविषयी कटुता येणार तेव्हा ही चर्चा इथेच थांबवा,प्रत्येकाने आपल्याला योग्य वाटेल ते करावे’ बाबांनी जाहीर केले.

घरातले वातावरण तंग होते. आजोबा काहीच बोलत नव्हते आणि त्याचीच सगळ्यांना भीती वाट होती. आईच्या आणि विनीच्या मदतीने मानव उदघाटनाची तयारी करत होता.नेहमीप्रमाणे आजी शांत होती तर बाबा अस्वस्थ. ठरल्याप्रमाणे  हॉटेलचे उदघाटन  झाले.घरातले सगळे आले .आजोबांनी मानवला जवळ बोलावले ‘आधी मला राग आला होता पण तो निवळला.तू मांडलेले मुद्दे खरंच विचार करण्यासारखे आहेत. पितृपक्षाकडे पाहण्याचा नवीन चांगला विचार तू दिलास. थँक्यू’ शाबासकी देताना आजोबांनी  गिफ्ट दिले. लहान मुलाच्या उत्सुकतेने गिफ्ट उघडल्यावर मानव ओरडला ‘आजोबा, हे काय ???’

‘ काउंटरजवळ ठेव भरभराट होईल.पूर्वजांचा आशीर्वाद तुझ्यापाठी कायम असावा म्हणून मुद्दाम हेच गिफ्ट दिले आहे’.

गिफ्ट दिलेल्या फ्रेममध्ये फोटो होता तो एका कावळ्याचा.

**-मंगेश मधुकर**

# आपला वारसा

## हेरीटेज म्हणजे काय?

**गे**ल्या दोन लेखातून पुण्याच्या हेरीटेजची ओळख आपण करून घेत आहोत. पण मुळात हेरीटेज म्हणजे काय हे प्रथम आपण समजून घेऊया. हेरीटेज म्हंटल कि आपल्या डोळ्यासमोर येतात जुने वाडे,पुरातन महाल, लेणी, किल्ले, जुन्या काळातील वस्तू. अजून जरा पुढे जाऊन विचार केला तर फार-फार तर आपल्या कला जसे कुंभारकाम , विणकाम, चित्रकला, तांबटकाम, हातमाग, बुरुडकाम इत्यादी. शक्यतो ह्या पलीकडे जाऊन हेरीटेज ह्या शब्दाचा आपण फारसा विचार करत नाही. **'हेरीटेज'** ह्या शब्दाचा आपण सरळ सरळ मराठीत अनुवाद केला तर शब्द मिळतो **'वारसा'**.

पुण्याला समृद्ध असा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा मिळालेला आहे. हे वाक्य आपण अनेक वेळेला ऐकतो आणि अनेक ठिकाणी वापरतो सुद्धा. पण वारसा हा फक्त ऐतिहासिक आणि सांस्कृतिक गोष्टींमध्ये थांबत नाही तर त्याची व्याप्ती त्यापेक्षा खूप जास्त मोठी आहे. हेरीटेज ह्याचा जेवढा सरळ सरळ अनुवाद वारसा असं होतो तेवढी सरळ त्याची व्याख्या नाही. हेरीटेज म्हणजे काय असे जर शब्दकोशात शोधले तर आपल्याला व्याख्या मिळेल की, अशी कोणतीही गोष्ट , वस्तू, ज्ञान, विचार, पद्धत, जागा जी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्त करता येते किंवा केली जाते. काही ठिकाणी हेरीटेज याची अशी पण व्याख्या सांगितली जाते की, अशा वस्तू, जागा किंवा पद्धती ज्या औपचारिकपणे कायद्यानुसार संरक्षित केल्या जाऊ शकतात. अजून एक सामान्य पद्धत आहे ती म्हणजे वर्गीकरण करून व्याख्या करणे. हेरीटेज ह्या संकल्पनेचे ढोबळ वर्गीकरण होते ते म्हणजे मूर्त (ज्या वस्तू माणसाने बनवल्या) आणि अमूर्त किंवा नैसर्गिक (ज्या माणसाने नाही बनवल्या ). ही एक सर्वसामान्य आणि पटकन कळणारी व्याख्या असली तरी यात पुढे अनेक प्रश्न निर्माण होतात.ते म्हणजे मग सार्वजनिक किंवा सामाजिकमूल्यांचे काय? ते कोणत्या व्याख्येत बसतात? दोन्ही पैकी कोणत्याही वर्गीकरणामध्ये त्यांना बसवणे अवघड आहे. एकूणच हेरीटेज ह्या शब्दाची सार्वभौम परिभाषा किंवा व्याख्या करणे हे अवघड आहे.

माझ्या मते वारसा ही परिभाषा करण्याची गोष्ट नसून ती






समजण्याची किंवा जाणीव करून घ्यायची गोष्ट आहे. अशी कोणतीही गोष्ट, जागा,विचार,वस्तू, पद्धत, ठिकाणी, ज्याचे वर्तमानकाळात महत्व आहे आणि जी आपल्या भूतकाळाशी सापेक्ष आहे तो आपला वारसा. अजून समजून घेण्यासाठी आपण हेरीटेज ह्या संकल्पनेचे वर्गीकरण करूया.

**१.मूर्त वारसा** ( tangible heritage ) : याला आपण अजून 'चल' आणि 'अचल' असे विभागू शकतो.

- चल वारसा म्हणजेच चित्रे, शिल्पे, वस्तू इत्यादी
- अचल वारसा म्हणजेच ऐतिहासिकवास्तू, इमारती, पुरातन जागा

**२.अमूर्त वारसा** (intangible heritage) : ह्यामध्ये खालील गोष्टी समाविष्ट केल्या जातात

- मौखिक ज्ञान , चाली रिती, संगीत, कला
- शास्त्र, सवयी ज्या निसर्ग किंवा समाजाशी निगडीत असतील
- पारंपारिक शास्त्रे किंवा कौशल्ये

**३.नैसर्गिक वारसा** ( Natural heritage) : म्हणजेच आपल्या जैव विविधतेमध्ये असणाऱ्या किंवा सापडणाऱ्या सर्व गोष्टी. जसे कि झाडे, पर्वत, डोंगररांगा, नदी, नाले, प्राणी, पक्षी इत्यादी सर्व काही.

वरील सर्व गोष्टींवर जरा विचार केला तर लक्षात येईल. वारसा या शब्दामध्ये अनेक गोष्टी सामावलेल्या आहेत.तो फक्त जुन्या इमारती, संग्रहालये,वस्तू, पुरातन गोष्टी किंवा नदी, नाले डोंगर यांच्यात सामावलेला नाही.

आपले शिक्षक जे ज्ञान विद्यार्थ्यांना देतात तो आपला वारसा आहे, आपण जी पुस्तके वाचतो तो आपला वारसा आहे. विचारवंतांनी लिहून ठेवलेले विचार, त्यांची भाषणे हा आपला वारसा आहे. गणपतीची केलेली आरती, पाडव्याला उभारलेली गुढी आपला वारसा आहे. आपण जी भाषा बोलतो, शिकतो ती आपला वारसा आहे.आपल्या गावातून, शहरातून वाहणारी नदी आपला वारसा आहे. बागेत लावलेलं आंब्याच किंवा तुळशीच रोप आपला वारसा आहे. लहानपणी आपण जमवलेली नाणी , नोटा इतकाच काय तर काडेपेटीचे कव्हर देखील आपला वारसा आहे आणि अशा गोष्टी जमवण्याचा छंद देखील आपला वारसा आहे. एखादी शिकलेली कला आपला वारसा आहे. दिवाळीत बनवले किल्ला आपला वारसा आहे.पुण्याविषयी असलेला आपला जाज्वल्य अभिमान आणि खडूसपणे लिहिलेल्या पाट्या हासुद्धा आपला वारसा आहे.आईने मुलीला शिकवलेला स्वैपाक देखील आपला वारसा आहे आणि आजीने नातीला सांगितलेली गोष्टसुद्धा आपला वारसा आहे.. एकूणच आपल्या आजूबाजूला छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आपले हेरीटेज किंवा आपला वारसा लपलेला आहे. आपल्या दैनंदिन जीवनात, वागण्यात चाली-रीतींमध्ये तो सामावलेला आहे. कळत नकळत आपण तो जोपासतही असतो. गरज आहे ती फक्त जाणीवपूर्वक त्याच्याकडे पाहण्याची आणि पुढे नेण्याची.

**-मधुर बर्वे**



रो. आनंद

## उत्कृष्ट फोटो



रो. केदार कालकोटे



## रौटरीचे दर महिन्यातील उद्दिष्ट

### ऑक्टोबर महिना 'आर्थिक आणि सामाजिक विकास'

समाजाच्या आणि देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण म्हणजे आर्थिक दारिद्र्य, हे लक्षात घेऊन रोटरीने हा विषय आपल्या कार्याचा मूलभूत विषय म्हणून अंगिकारलेला आहे. विविध क्लब्सनी याला प्राधान्य देऊन ऑक्टोबर महिन्यातील आपले कार्यक्रम आखावेत अशी अपेक्षा आहे. गरीबीची मूळ कारणे रोजगारीच्या संधी नसणे, आवश्यक कामांचे ज्ञान नसणे, कौशल्याचा आणि त्यासाठीच्या शिक्षणाचा अभाव असणे, भांडवल आणि खेळत्या पैशाचा अभाव, आणि बनविलेल्या मालाला विक्रीच्या संधी नसणे ही आहेत. ही कारणे स्थानिक परिस्थिती सापेक्ष आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कारणांचं प्राधान्य असू शकतं. यासाठी प्रत्येक क्लबने भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास करून, तिथल्या गरजा ओळखून त्याप्रमाणे रणनीती आखली पाहिजे. कुठच्या प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध आहेत ते बघून त्याप्रमाणे तांत्रिक आणि कौशल्य शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे. हे करताना तरुणांना आणि स्त्रियांना प्राधान्य द्यावे. त्या त्या भागातील उद्योगधंद्यांना पूरक असे शिक्षण दिले तर ते जास्त उपयोगी ठरेल, म्हणजे शिक्षण पुरे झाल्यावर लगेच रोजगार मिळू शकेल. प्रशिक्षित कामगारांमुळे उद्योगधंद्यांची वाढ आणि त्यामुळे परत आणखी रोजगार संधी असं हे परस्परपूरक चक्र चालू झालं की मग त्या भागाचं स्वरूपच पालटून जाईल.

छोट्या उद्योगांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्या दृष्टीने पावले टाकावीत. एका चिनी तत्ववेत्त्याच्या उक्ती प्रमाणे 'भुकेल्याला तुम्ही मासा द्या त्याची भूक एक दिवस भागेल. त्या ऐवजी त्याला मासेमारीची साधनं द्या, त्याची भूक जन्मभराची भागेल.' हे लक्षात ठेवूनच आपल्या कामाची आखणी केली तर ते जास्त परिणामकारक होईल. समाजातील एक अत्यंत दुर्बल घटक म्हणजे दारिद्र्य रेषेखालील स्त्रिया. या स्त्रियांना अगदी घरगुती व्यवसाय सुरु करताना सुद्धा मुख्य प्रश्न भांडवल आणि विक्री हा असतो. त्यासाठी रोटरीने मायक्रो क्रेडिट सारख्या अनेक योजना जगभरात यशस्वीपणे राबविलेल्या आहेत. विक्रीसाठी सहकारी संघटनाही उभ्या केल्या आहेत. अनेक स्त्रियांनी या योजनांचा लाभ घेऊन दारिद्र्यावर यशस्वीपणे मात केली आहे.

भारतातील अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा घटक म्हणजे खेडेगावे. शेती, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन इ. हीच त्यांच्या उपजीविकेची साधने. पण त्याबाबतीतही प्रशिक्षणाच्या अभावामुळे त्यांना ते व्यवसाय फायदेशीरपणे राबविता येत नाहीत. या साठी आपली खेडे दत्तक योजना ही त्या भागासाठी एक वरदानच ठरते. शेती संबंधी आधुनिक पद्धतीचे शिक्षण, पाण्याचं नियोजन, योग्य खतांचा उपयोग, जमिनीचा कस वाढविण्याच्या पद्धती अशी शिबिरे उपयोगी ठरतात. दुग्ध आणि इतर व्यवासायांसाठी अशीच शिबिरे आयोजित करण्यात येतील. त्या पुढचा त्यांचा प्रश्न म्हणजे त्यांच्या या उत्पादनाच्या विक्रीचा. यासाठी त्यांची संघटना बांधणे, त्यांचा मुख्य बाजारपेठांशी संपर्क साधून देणे ही मोठी गरज असते. तिथेही आपण मदत करू शकतो.

या सर्व उपक्रमांसाठी आपले सभासद, रोटरॅक्टर्स, विविध विषयातील तज्ञ, स्थानिक नेतृत्व, सरकारी योजना, जवळपासचे उद्योग, सहकारी संस्था यांचा गरजेप्रमाणे चपखल उपयोग करून घेता यायला हवा. तसेच या कामांसाठी, विविध समाजसेवी संस्था, जवळपासचे उद्योग, आणि मुख्य म्हणजे सरकारी अनुदाने यांच्याकडून निधीची उपलब्धता होऊ शकेल. मोठ्या प्रोजेक्ट साठी ग्लोबलग्रँटच्या पर्यायाचाही विचार करता येईल. काम मोठं आहे पण आपण आपला खारीचा वाटा जरूर उचलावा.

**-रो. पी.पी. सुरेश नातू.**



**तनया बाबाराम सालवी, (वय-१४ ते २० वर्ष)**




**ऐश्वर्या पंकज जोशी, (वय-११ वर्ष)**
**प्लॉट, नं. २३, देवडा नगर, हिंगोली.**